दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २३३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२३ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यात मध्यावधीचे संकेत?

## रावसाहेब दानवेंच्या विधानामुळे भुवया उंचावल्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार हे स्थीर असून लवकरच मंत्रीमंडळ विस्तार होणार असल्याचे समजते. मात्र, दुसरीकडे मध्यावधी निवडणुका लागण्याचे संकेत विरोधकांकडून सातत्याने देण्यात येत आहेत. आता, केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांनी केलेल्या विधानामुळे पुन्हा एकदा मध्यावधींचे वेध लागले आहेत. तर, शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांनी दावनेंच्या विधानावरुन, हे सरकार १०० टक्के पडणार असल्याचं म्हटलंय. त्यामुळे, एकीकडे मंत्रीमंडळ विस्तार आणि दुसरीकडे मध्यावधींची चर्चा रंगली आहे.**

राज्यात लवकरच मध्यावधी निवडणुका लागतील, असा अंदाज विरोधी पक्षातल्या नेत्यांकडून गेल्या काही दिवसांत सातत्यानं व्यक्त करण्यात येत आहे. शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार यांच्यापासून महाविकास आघाडीतील लहानमोठे अनेक नेते मध्यावधी निवडणुका लागण्याचा अंदाज व्यक्त करत आहेत. तर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही काही दिवसांपूर्वी तोच सूर आळवला. जानेवारी महिन्यात मध्यावधी निवडणुका लागतील असं विधान राज ठाकरेंनी केलं होतं. आता, केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवेंच्या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

भाजप सेनेची युती तुटली, गेल्या २.५ वर्षांत चाललेलं महाविकास आघाडीचं सरकार पडेल, असं कुणालाही वाटत नव्हतं. पण, अशी जादू झाली की एक रात्रीत सरकार गेलं.

**रावसाहेब दानवे आमचे चांगले मित्र आहेत, त्यांची स्लीप ऑफ टंग होऊन ते खरं बोल-लेले आहेत. दोन महिन्यांनी वेगळं चित्र असेल म्हणजे मध्यावधीची घोषणा होऊ शकते. किंवा हे सरकार पडू शकतं, याचे संकेत रावसाहेब दानवेंनी दिले आहेत. हे सरकार १०० टक्के पडू शकतं, अशी माझ्याकडे पूर्णपणे माहिती व खात्री आहे, असेही ते म्हणाले.**



आता, असंच राजकारण चाललं तर आणखी दोन महिन्यांनी काय होणारय, याचा कोणी अंदाज लावला का? असे केंद्रीयमंत्री आणि भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी म्हटलं. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी तर राज्यातील परिस्थिती पाहता राष्ट्रपती राजवट लावा आणि निवडणुका घ्या असं विधान केलंय. पण विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मध्यावधी निवडणुका लागणार नाहीत असं म्हटलं होतं.

# कपल बारवर पोलिसांचा छापा, २८ जणांवर गुन्हा दाखल

## बार कायमचा बंद करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा विभागाने भिंगारी येथील कपल बारवर रात्री सव्वा एकाच्या सुमारास छापा टाकून २८ जणांवर कारवाई केली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

द कपल बार लाईव्ह आर्केस्ट्रा मधील बारचे मॅनेजर अरुण महाबळ शेट्टी व बारमध्ये काम करणारे आठ पुरुष वेटर यांनी वीस महिला वेटर यांना अश्लील हावभाव व अंगविक्षेप करण्यास परवानगी व प्रोत्साहन दिले. महिला वेटर ह्या बारमध्ये तोकडे कपडे परिधान करून अश्लील हावभाव व अंगविक्षेप करत असताना मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा यांना मिळून आले. पनवेल शहर पोलीस ठाण्यात २८ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील भिंगारी येथील वादग्रस्त ठरलेला कपल बारचा परवाना २०१८ मध्ये रद्द् करण्यात आला होता.

नियमांचे उल्लंघन केल्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी विजय सूर्यवंशी यांच्या आदे-शानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागकडून ही कारवाई करण्यात आली होती.

२०१३ याच कपल ऑर्केस्ट्रा बारवर ठाणे ग्रामीण पोलिसांनी धाड टाकूनयेथून ९० बारबालांची सुटका केली होती. यात ३२ अल्पवयीन मुली, ४३ ग्राहक आणि कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली होती. या बारमधून एक कोटी १६ लाख रुपये पोलिसांनी जप्त केले होते. कपल लेडीज बारप्रकरणी नवी मुंबई परिमंडल २ चे त. पोलीस उपायुक्त प्रमोदकुमार शेवाळे यांना सक्तीच्या रजेवर तर शहर पोलीस ठाण्याचे त. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश घडवले यांची बदली करण्यात आली होती. त्याच कपल बारवर वारंवार कारवाई होऊन देखील त्याचा परवाना कायमचा का रद्द केला जात नाही असा सवाल उपस्थित झाला आहे.



# सपोनि दत्तात्रय सुरेश धायगुडे यांची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील आजीवली येथे राहणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सुरेश धायगुडे यांनी राहत्या घरी कौटुंबिक कारणावरून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

पोलीस खात्यातील डायल ११२ महापे येथे नेमणुकीस असलेले दत्तात्रय सुरेश धायगुडे (वय ४० राहणार गगनगिरी अपार्टमेंट, रूम नंबर ३१० , आजीवली) यांनी त्यांच्या राहत्या घराच्या किचन मध्ये कौटुंबिक कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुरूड-एकदरा परिसराला विषारी वायूचा विळखा?

## पर्यावरण प्रदुषणामुळे ग्रामस्थ व नागरिकांतून संताप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूड-एकदरा परिसरात पहाटेच्या वेळी धुक्याऐवजी प्लॅस्टिकच्या विषारी धुराची चादर पसरत असल्याने परिसराला अक्षरशः विषारी वायूचा विळखा पडत आहे. मॉर्निंग वॉकला जाणा-यांना ऑक्सिजन ऐवजी प्रदुषित विषारी वायुचा श्वास घ्यावा लागत असल्याने या परिसरातील ग्रामस्थ व नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

या परिसरात भंगारवाले भंगारमध्ये मिळणाऱ्या केबल जमा करून यातील तांब्याच्या (कॉपर) तारा काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात जाळ करून प्लॅस्टिक पासून निर्माण होणारा विषारी वायू सोडून मोठ्या प्रमाणात प्रदूषण करीत आहेत. या धुराचे प्रमाण इतके असते की संपुर्ण परिसरात धुक्याऐवजी विषारी धुराची चादर पसरलेली पहावयास मिळते आहे.

पहाटे स्वच्छ हवेत ऑक्सिजन मिळवण्यासाठी अनेक नागरिक व ग्रामस्थ फिरायला येत असतात. अशावेळी ऑक्सिजन ऐवजी प्रदुषित विषारी प्लॅस्टिक धुराचा श्वास घ्यावा लागतो आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी व ग्रामस्थांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे.पर्यावरण प्रदुषण करणाऱ्या भंगारवाल्यांवर प्रशासनाने कडक कारवाई करावी. अशी मागणी जनमानसातून केली जात आहे.



# भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक भूमिका

## कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आ.महेश बालदी यांच्या मागणीनुसार बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भोकरपाडा येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन त्यांना न्याय देऊ, अशी ग्वाही राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आमदार महेश बालदी यांना दिली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आमदार महेश बालदी यांच्या मागणीनुसार आज (दि. २२) मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. त्यावेळी मंत्री महोदयांनी आश्वासित केले.

या बैठकीस आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय जैसवाल, सदस्य सचिव अभिषेक चव्हाण, मुख्य प्रशासकीय अधिकारी दिपाली देशपांडे, मुख्य अभियंता राजेश निघोट, अधिक्षक अभियंता चंद्रकांत गजभिये, कार्यकारी अधिकारी व्ही. के. सुर्यवंशी, कर्जत उपअभियंता एस. आर. भोसले, पनवेल उप अभियंता के. बी. पाटील, प्रशासन अधिकारी जे. के. कोळी, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे जलशुद्धीकरण केंद्र पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथे आहे. या केंद्रात गेल्या ३० वर्षापासून वेगवेगळ्या पदावरील अनेक कर्मचारी काम करत असून या सर्व कर्मचाऱ्यांना पगाराव्यतीरिक्त कोणत्याही सवलती आजपर्यंत दिल्या गेल्या नाहीत. याप्रकरणी उच्च न्यायालयामध्ये देखील सन २००७ मध्ये निकाल दिला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व कामगार मंत्रालय यांनी ६ महिन्यात निर्णय घेऊन त्यांची देणी अदा करावीत असा आदेश दिले होते. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने कोणतीही कार्यवही केलेली नाही. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने अधिक्षक अभियंता यांच्यासोबत बैठकीमध्ये अधिक्षक अभियंता यांनी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करून या जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांना नियमित करून घेण्याबाबत पत्रव्यवहाराने कळविले आहे. परंतु आजपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी केली होती. त्या संदर्भात आज मंत्री महोदय, संबंधीत विभागाचे अधिकारी व कामगार प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक पार पडली.

यावेळी आमदार महेश बालदी यांनी कामगारांच्या व्यथा मांडताना तातडीने कार्यवाही करण्याची आग्रही मागणी केली. त्यानुसार नामदार गुलाबराव पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत या संदर्भात प्रयत्नशील राहून कामगारांना न्याय देण्याचे आणि सर्वोत्तपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच आमदार महेश बालदी यांनी सूचित केल्याप्रमाणे येत्या आठवड्यात दोन वर्षांचा बोनस कामगारांच्या खात्यात जमा करणार असल्याचे सांगितले त्याचबरोबर भविष्य निर्वाह निधीची थकबाकी रक्कम संदर्भातचा विषयही मार्गी लावण्याचे त्यांनी मान्य केले. त्यामुळे या कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# राज्यपालांविरोधात रोह्यात सर्व समाज, राजकीय पक्षाचा 'एल्गार', प्रचंड घोषणाबाजी




**दै.रायगड नगरी । रोहा**

महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी महाराष्ट्राच्या अस्मितेचा अवमान केला. राज्यपाल कोश्यारी हे सतत बहुजन समाजाचे महापुरुष यांच्याविरोधात वक्तव्य करीत आलेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छ. शिवाजी महाराज यांच्याबद्दल पुन्हा एकदा संताप आणणारे वक्तव्य केले आणि राज्यपालांविरोधात महाराष्ट्र पेटून उठला. सर्व जिल्हा, तालुक्यांत विविध संघटना, राजकीय पक्ष, बहुजन समाज संघटना राज्यपाल कोश्यारी यांचा जाहीर निषेध करीत आहेत. याच पार्श्वभूमीवर रोहा येथील नगरपरिषदेच्या समोर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या विरोधात मंगळवारी जोरदार घोषणाबाजी झाली. नीम का पत्ता कडवा है.. असा संतापजनक एल्गार सहभागी सर्व समाज, राजकीय पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी करत निषेध व्यक्त केला. दरम्यान, बहुजन समाजाचे महापुरुषांची बदनामी खपवून घेणार नाही, राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना महाराष्ट्रातून हद्दपार करा, नाहीतर सर्व बहुजन समाज, राजकीय संघटना अधिक उग्र आंदोलन करतील अशा आशयाचे निवेदन तहसीलदार रोहा यांना देण्यात आले, तर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या वक्तव्याविरोधी निषेधार्थ आंदोलनात सामाजिक संघटना समवेत राष्ट्रवादी, शिवसेना राजकीय पक्षाचे ने-तेगण, कार्यकर्ते एकत्र आल्याचे यानिमित्त समोर आले. बहुजन महापुरुषांचे अपमान करणाऱ्याविरोधात आपण एक राहू या अशा रोहा सिटीझन फोरमच्या आवा-हनाला सर्वांनीच मोठा प्रतिसाद दिला.


राज्यपाल हटाव मोहीम राज्यात सर्वत्र सुरू झाली आहे. आधी युगपुरुष महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्यावर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी अवमानकारक भाष्य केले. आराध्य दैवत छ. शिवाजी महाराज यांच्याबद्दल वारंवार गरळ ओकत आहेत. त्याबद्दल संबंध महाराष्ट्रात प्रचंड असंतोष आहे. परत त्यात राज्यपालांनी अधिक भर टाकल्याने सर्व समाज, राजकीय संघटना आक्रमक झाल्या. राज्यपाल कोश्यारींच्या वक्तव्याचा निषेध करत ठिकठिकाणी संताप व्यक्त झाला. रोहा येथे रोहा सिटीझन फोरमच्या आवाहनाला प्रतिसाद देत सामाजिक, समाज

.../२

# पाली नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा गीता पालरेचा यांनी नगराध्यक्ष पदाचा दिला राजीनामा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी जिल्हाध्यक्षा तथा राष्ट्रवादी चे ज्येष्ठ नेते वसंतराव ओसवाल यांच्या कन्या भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा काही दिवस धुमसत आहे. प्रथम स्थापित पाली नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्षा गीता पालरेचा यांनी अवघ्या नऊ महिन्यातच नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचा रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांचे कडे राजीनामा सादर केला आहे. हा राजीनामा जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी मंजूर केला असून नगराध्यक्ष हे पद आता रिक्त



झाले आहे. त्यामुळे पाली नगरपंचायत अध्यक्ष पदाची निवड होईपर्यत अध्यक्ष पदाचा कार्यभार उपाध्यक्ष आरिफ मणियार यांनी स्वीकारण्याचे आदेश महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ६० नुसार रायगड जिल्हाधिकारी यांनी दिले आहे. त्यामुळे पाली नगराध्यक्ष पदाचा प्रभारी कार्यभार उपनगराध्यक्ष आरिफ मणियार यांना देण्यात आला आहे.

पालरेचा यांनी पाली नगरपंचायतीचे नगरअध्यक्ष व नगरसेवक पदाचा राजीनामा दिल्याने प्रभाग क्रमांक १० मध्ये लवकरच पोट निवडणूक होणार

.../२

# मुंबईत जागतिक दर्जाचे नवीन मत्स्यालय उभारणार : ना. सुधीर मुनगंटीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईत जागतिक दर्जाचे नवीन मत्स्य संकुल आणि अत्याधुनिक मत्स्यालय उभारण्यात येईल, असे आज मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

मंत्रालयात तारापोरवाला मत्स्यालयासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी यासंदर्भातील निर्देश विभागाला दिले. हे नवीन जागतिक दर्जाचे मत्स्यालय सार्वजनिक खाजगी भागीदारी



तत्वावर विकसित करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करावा. हे मत्स्यालय जगा-तील सर्वोत्तम मत्स्यालयापैकी एक गणले जावे, याचे नियोजन करावे, असेही निर्देश मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिले.

मुंबईची ओळख

.../२

# टाटा स्टीलच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सावरोली गावस्थित असलेल्या टाटा स्टील कंपनी आपल्या व्यवसाय धोरणांतून समाजाचे हित जपण्यासाठी सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रमे राबवत आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी स्थानिक लोकांना पिण्याचे पाणी, अन्नधान्य वाटप, आदिवासी बांधवांच्या घराचे नूतनीकरण, आरोग्य सुविधा, वृक्षारोपण, महिला सबलीकरण, ग्रामीण महिला मेळावा, सरकारी शाळांमध्ये ई-लर्निंगच्या पायाभूत सोयीसुविधा अशा विविध योजना राबविल्या आणि त्याचा लाभ हजारो लोकांना झाला आहे.

आधीची भूषण स्टील लिमिटेड ही कंपनी टाटा स्टीलने मे २०१८ मध्ये अधिग्रहित केली. त्यावेळी त्यांनी व्यवस्थापन व कामगार वर्गातील एकाही कर्मचाऱ्याला बदलले नाही. टाटा स्टील, त्यांच्यासोबत काम करणाऱ्या इतर कंपन्या आणि व्हेंडर सहयोगी यांच्याकडील जवळपास ७२% नवे कर्मचारी हे महाराष्ट्रातील आणि खासकरून खालापूर, कर्जत व रायगड जिल्ह्यातील गावांमधील आहेत. कंपनीने खरेदी व कंत्राट व्यवस्थापन यंत्रणेमध्ये देखील पुरेपूर पारदर्शकता ठेवली असून कोट्यवधी रुपयांची अनेक कंत्राटे सा-वरोलीतील स्थानिक व्यावसायिकांना देण्यात आली असल्याचे टाटा स्टील व्यवस्थापनाने अधोरेखित केले आहे.

या भागात सर्वसमावेशक वृद्धीला प्रोत्साहन देण्यासाठी टाटा स्टीलने सा-वरोली, देवन्हावे आणि खालापूर भागात हाती घेतलेला एक प्रमुख प्रकल्प डब्ल्यूईई (महिला सक्षमीकरण आणि उद्यमशीलता) हा आहे, स्वयंसहायता गट तयार करून तसेच पिण्याचे स्वच्छ पाणी व आई-बाळाच्या आरोग्यासाठी अधिक चांगल्या आरोग्य सेवासुविधा पुरवून सूक्ष्म उद्योग उभारून महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीमध्ये विकास घडवून आणणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. आजवर ६०० पेक्षा जास्त महिला आणि पाच वर्षांखालील मुलांना या उपक्रमाचा लाभ मिळाला आहे. सावरोली-निफाण आदिवासीवाडीमध्ये पाणी साठवण्यासाठी ओव्हरहेड टाकी बांधून आणि देवनहावे पंचायतीमध्ये स्थानिक पाणीसाठ्यांचे पुनरुज्जीवन करून टाटा स्टीलने पाणी साठवण्याची क्षमता ६७ लाख लिटर इतकी वाढवली आहे. एक हजार पेक्षा जास्त कुटुंबांना याचा लाभ मिळत असून स्थानिक आदिवासींना चांगले मासे उपलब्ध होऊ लागले आहेत.

लाईव्ह-लर्निंग थ्रू व्हायब्रंट एज्युकेशन हा आणखी एक प्रकल्प असून, डिजिटल वर्ग आणि अभ्यासाच्या नवनवीन पद्धती यांच्यामार्फत स्थानिक शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढवणे हा याचा उद्देश आहे. ८ सरकारी शाळांमध्ये ३० वर्गांमध्ये ई-लर्निंगच्या पायाभूत सोयीसुविधा इन्स्टॉल करण्यात आल्याने २०२२ वर्षात ११०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण टक्केवारीत लक्षणीय वाढ करून दाखवली आहे. काँक्रीट रस्त्यांचे बांधकाम आणि आदिवासी कुटुंबांच्या घरांचे नूतनीकरण करण्यात आल्याने सावरोलीमधील धामणी आदिवासी वाडीतीळ २००० पेक्षा जास्त लोकांना लाभ मिळाले आहेत. महामारी सुरु झाल्यापासून लोकांना सुके रेशन पुरवणे, पीपीई किट्स, वैद्यकीय उपकरणे, व्हेन्टिलेटर्स आणि बायपॅप मशीन इत्यादी सामग्री रायगड जिल्हा प्रशासनामार्फत पुरवून टाटा स्टीलने कोविड-१९ विरोधातील लढ्यामध्ये स्थानिकांची मदत केली आहे.

# आध्यात्मिकता व मानवता संगे संगे असा संदेश देणाऱ्या ७५व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचा समारोप

**समालखा । वृत्तसंस्था**

''स्वतःला शांती व प्रेमाचे प्रतिरूप बनवून अवघ्या जगामध्ये या दिव्य भावना जगभर पसरवत जावे'' असे उद्गार निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी ७५व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समापन सत्रामध्ये देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने सहभागी झालेल्या विशाल मानव परिवाराला संबोधित करताना काढले. या समागमामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भक्तगण आले होते.



सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या आशीर्वचनाद्वारे प्रेम, शांती व मानवतेचा दिव्य संदेश प्रसारित करणाऱ्या या पाच दिवसीय समागमाची यशस्वी सांगता झाली. भव्य-दिव्य रूपात आयोजित करण्यात आलेल्या ७५व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या आयोजनाने समालखा (हरियाणा) येथील संत निरंकारी आध्यात्मिक स्थळाचे प्रांगण श्रद्धा, भक्ति व प्रेमाच्या दिव्य प्रकाशाने आलोकित झाले होते. अध्यात्माच्या या पावन व मनोहारी उत्सवामध्ये सहभागी होऊन भक्तगण आनंदविभोर झाले होते. दिनांक १६ ते २० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत या संत समागमाचे आयोजन करण्यात आले होते.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जवाहर नवोदय विद्यालय नियोजन व सल्लागार समितीची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जवाहर नवोदय विद्यालय, रायगड यांची विद्यालय नियोजन समिती (Vidyalaya -dministration Committee) आणि विद्यालय सल्लागार समिती (Vidyalaya -dvisory committee) यांची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, दि.२१ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील व विद्यालयाच्या वतीने प्राचार्य किरण इंगळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्स्ना शिंदे, उपप्राचार्य शिरीष जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक प्रतिनिधी डॉ.रवींद्र रोकडे, नवोदय विद्यालयाचे कार्यालय अधीक्षक नितीन बुधगे, शैलेश पडवळ, गणेश अडोडे, श्री.कडू, लोकसभा खासदार सुनिल तटकरे यांचे प्रतिनिधी तुकाराम सुतार, शिक्षक पालक संघटनेचे सदस्य नितीन बडे हे उपस्थित होते.

या बैठकीत विद्यालयाकरिता सांस्कृतिक सभागृह, सोलार लाईट योजना, विद्यालयातील आपातकालीन स्थितीसाठी वाहन व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय चाचण्या आणि वैद्यकीय शिबिर, विद्यालयाचे लँडस्केपिंग, विद्यालयाच्या मैदानांची दुरुस्ती इत्यादी महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दि.२८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विद्यालयात वैद्यकीय शिबीर घेण्याची सूचना प्राचार्यांना दिली.




## उरण नगरपरिषद, उरण
## जाहीर सूचना-२०२२

**(महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११८, ११९ अन्वये)**

उरण नगरपरिषदेने सन २०२२-२३ या वर्षातील नव्याने बांधकाम झालेल्या इमारती, वाढीव बांधकाम झालेल्या इमारतीचे / घरे यांची मालमत्ता कर आकारणी यादी तयार केलेली असून सदर यादी नगरपरिषद कार्यालयात सुट्टीचे दिवस खेरीज कार्यालयीन वेळेत मालमत्ता धारकांस, भोगवटा धारकास किंवा अभिकर्त्यास माहणेसाठी खुली ठेवलेली आहे. त्यावरील हरकती दि.२३/१२/२०२२ पर्यंत स्वीकारण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./उनप/कर विभाग/२०२२/२८२५

दिनांक २२/११/२०२२

**सही/-**
**(श्री.राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



मा.इंदलकर साहेब यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील : ॲड.हिरामण एस. पारधी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

फौजदारी एम.ए.क्र.१२८३/२०२२

ने.ता.०४/०१/२०२३

श्री.कमलाकर बुधाजी ठाकरे — अर्जदार

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत नानोशी
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, १) सदर अर्जदार श्री.कमलाकर बुधाजी ठाकरे यांचा जन्म दि.११/११/१९७९ रोजी मु.बेलवाडी (नानोशी), ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदाराकडून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नोंदणी अभिलेखात नोंद करण्याचे अनावधानाने राहून गेलेले आहे. सबब जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदारांच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी अर्जदार यांनी ग्रुप ग्रामपंचायत नानोशी, ता.पनवेल, जि.रायगड यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

२) सदर अर्जास कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयाकडे ३० दिवसांच्या मुदतीच्या आत सादर कराव्यात. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मा.न्यायालय अर्जदार यांच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी ग्रुप ग्रामपंचायत नानोशी यांस योग्य ते आदेश पारित करतील याची नोंद घ्यावी.

आज दि.२२/११/२०२२ रोजी आमचे सहीने ना.न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



श्री.मुजावर सो.कोर्ट

ॲड.तरबेज मास्टर
अर्जदारतर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३९३/२०२२
नि.नं.१६/ड
ने.ता.२३/१२/२०२२

१) श्रीमती.बैसुननीसा अबुल हसन खान
वय : ५९ वर्षे, धंदा : घरकाम
२) आसिया अबुल हसन खान
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
३) मोहम्मद उमर अबुल हसन खान
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
तिघेही रा.फ्लॅट नं.१०५, पहिला मजला,
रिझवी हाऊस, वीट सेंटर जवळ,
बंदर रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडील कै.अबुल हसन रईस अहमद खान यांच्या नावे असलेल्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन : फ्लॅट क्र.१०५, पहिला मजला, रिझवी हाऊस, वीट सेंटर जवळ, बंदर रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, सी.टी.एस. नं.२२१/अ, २२१-अ/१ आणि २२१-अ/२/७, फ्लॅट क्षेत्र ५३६ चौ.फूट (बिल्टअप)**

कै.अबुल हसन रईस अहमद खान हे दि.१४/०५/२०२० रोजी फ्लॅट नं.१०५, रिझवी हाऊस, वीट सेंटर जवळ, बंदर रोड, पनवेल (मनपा), ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याने प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने / नी / आपली / त्या लेखी हरकत / ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : पालेबुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पालेबुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पालेबुद्रुक | निराबाई पांडुरंग तोडेकर | ९४/४/५ | ०-४३-०० | २.९७ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२२/११/२०२२

**सही/-**
**ॲड.महेश भगत**
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८६५५१५८७८१**



Godase Judge

Adv. Radha S

## PUBLIC NOTICE

IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE-
SENIOR DIVISION, PANVEL
CIVIL MISC. APPLICATION NO.1647/2022
Exh No. 8/D
Next Date : 07/01/2023

Dhananjaya Sunder Shetty
Chandan Dhananjaya Shetty
Ms. Khushboo Dhananjaya Shetty — Applicants

Let it be known to all concerned that deceased Late Mrs.Sunita Dhananjaya Shetty dided on 12/06/2010. Therefore the applicants have filed the Misc.Application No.1647/2022, Application for Heirship Certificate Under the Provisions of Bombay Regulation Act VIII of 1827.

SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY

A. 100% share in a Row House, admeasuring about 673 Sq. feet built-up, being Room No.C-002, Nav Bharat CHS, Plot No.5-8, Sector-2, New Panvel East, Raigad District, Maharashtra-410206/

B. 100% share in a Shop, admeasuring about 610 Sq. feet built-up, being Room No.C-001, Nav Bharat CHS, Plot No.5-8, Sector-2, New Panvel East, Raigad District, Maharashtra-410206.

C. 100% share in a Row House, admeasuring about 356 sq. feet built-up being Row House No.12, at Ekta CHS, Plot No.D 35, Sector 6, New Panvel East, Raigad-410206

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited. Then they may appear in person or through thier Advocate, objecting this application in the Court of Civil Judge S.D. at Panvel, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of the notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Given under my had the seal of the court this date dt 22/11/2022

Sd/- Jr.Clerk Civil Court Sr.Div., Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superindent. Civil Court Sr.Div., Panvel



मा.सोनावणे साहेब कोर्ट

ॲड.शशिकांत काळु म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६२८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२३

१) मुमताज मुश्ताक शेख
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) अब्दुल लतीफ मुश्ताक शेख
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
३) अब्दुल रशीद मुश्ताक शेख
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
४) अब्दुल करीम शेख
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.तळोजे पाचनंद, पो.तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड
५) आयशा उसमान गुजर
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.७०, बनोल गाव, आंबिवली रोड,
ईस्ट कल्याण, मोहणे, ता.जि.ठाणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील पै.मुश्ताक लतिफ शेख हे दि.०७/१०/२०२१ मौजे : के.जे.सोमय्या हॉस्पिटल, मुंबई येथे मयत झालेले आहेत. तसेच पै.मुश्ताक लतिफ शेख यांची आई पै.रातुनबी अ.लतिफ शेख या दि.२७/०९/१९९१ रोजी मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

पै.मुश्ताक लतिफ शेख यांचे मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मालमत्ता क्र. | जुना मालमत्ता क्र. | क्षेत्रफळ चौ.फुट | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| तळोजा, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड | १४२२ | ६०० ब | ६४० | ५९ |

नात्याने अर्जदार क्र.१ ते ५ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.मुश्ताक लतिफ शेख यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस पै.मुश्ताक लतिफ शेख यांचे अर्जदार नं.१ ते ५ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## राज्यपालांविरोधात रोह्यात सर्व समाज, राजकीय पक्षाचा 'एल्गार', प्रचंड घोषणाबाजी

मुख्यत: राजकीय पक्षानी प्रतिसाद देत वात्रट राज्यपालांविरोधात एल्गार करत पदाधिकारी, कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. नीम का पत्ता कडवा है... एवढी माणसं कशाला कोश्यारीच्या मयताला, चले जाव, कोश्यारी चले जाव अशा घोषणांनी परिसर अक्षरशः दणाणला, राज्यपाल हटाव आंदोलनात राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस विजयराव मोरे, शिवसेना तालुकाप्रमुख समीर शेडगे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, सकल मराठा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख, रोहा सिटीझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, सलाम रायगडचे संपादक राजेंद्र जाधव, बौद्ध समाज युवा अध्यक्ष जितेंद्र गायकवाड, प्रेस क्लबचे अध्यक्ष शशिकांत मोरे, समिधा अष्टीवकर, अनंत देशमुख, रोहिदास पाशिलकर, प्रशांत देशमुख, संदीप सावंत, राजेश काफरे, राम नाकती, चंद्रकांत पार्टे, अनिल भगत, समीर दर्जी, अल्ताफ चोरडेकर, सूर्यकांत मोरे, अमोल देशमुख व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राज्यपालांविरोधात प्रचंड घोषणाबाजी देत संताप व्यक्त केला. राज्यपालांना तातडीने पदावरून हटवत महाराष्ट्रातून हद्दपार करा, अन्यथा अधिक उग्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा सिटीझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब यांनी यावेळी दिला. राज्यपाल हटाव अशा आशयाचे निवेदन तहसीलदार प्रशासनाला देण्यात आले. दरम्यान, राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, भाजपाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांच्या वक्तव्याचा निषेध करत फोटोला जोडे मारण्यात आले, यावेळी शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निषेध आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आंदोलनात मुख्यत: पक्षीय मतभेद विसरून सत्ताधारी, विरोधक एक दिसल्याचे समाधानकारक चित्र अधोरेखीत झाले आहे.

## गीता पालरेचा यांनी नगराध्यक्ष पदाचा दिला राजीनामा

हे निश्चित झाले असून त्या निवडणुका कधी होणार आणि नव्याने कोण पाली नगरपंचायतीचा नगराध्यक्ष होणार याची उत्सुकता पालीकरांसह सुधागड वासियांना लागली आहे.

## मुंबईत जागतिक दर्जाचे नवीन मत्स्यालय उभारणार : ना. सुधीर मुनगंटीवार

असलेले तारापोरवाला मत्स्यालय गेल्या काही दिवसांपासून पर्यटकांसाठी बंद आहे. तारापोरवाला मत्स्यालयाची इमारत जवळपास ७५ वर्षे जुनी आहे. तर बाजूची इमारतही ५० वर्षांपेक्षा जास्त जुनी आहे. मत्स्यालयाच्या परिसरात सुरू असलेल्या कोस्टल रोडच्या कामामुळे मत्स्यालयाच्या इमारतींना धक्का पोहोचला असून त्या धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे या इमारती लवकरात लवकर निर्लेखित करण्याचे निर्देशही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिले. सध्या तारापोरवाला मत्स्यालयात १६ सागरी पाण्याच्या टाक्यांमध्ये ३१ प्रकारचे मासे आहेत. तर गोड्या पाण्यातील आणि ३२ ट्रॉपीकल टाक्यांमध्ये ५४ प्रकारचे मासे आहेत.

तारापोरवाला मत्स्यालयाबाबतच्या या आढावा बैठकीस मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव पराग जैन नानोटिया, मत्स्य व्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उरणच्या एस.एस.पाटील शाळेचे क्रिडा क्षेत्रातील विक्रमी शिखर

**दै.रायगड नगरी । उरण**

एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूल द्रोणागिरी उरण या शाळेतील विदयार्थ्यांनी क्रिडा क्षेत्रात पुन्हा एकदा नाविण्यपूर्ण कामगिरी बजावली आहे.१० वी यूनिफाइड जिल्हा स्तरीय चॅम्पियनशीप २०२२ ही स्पर्धा सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये एस. एस. पाटील शाळेच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले आहे. स्वयम पाटील इयत्ता दुसरी सुवर्णपदक,स्मिथ नारंगीकर इयत्ता दुसरी सुवर्णपदक,दिव्य मुंबईकर इयत्ता दुसरी सुवर्णपदक, आदित्य घोड़के इयत्ता सहावी सुवर्णपदक,आरुष पाटील इयत्ता सातवी सुवर्णपदक,रूद्र भोसले इयत्ता सातवी सुवर्णपदक,अक्षरा घोडके इयत्ता सहावी सुवर्णपदक,त्रिशिता भोईर इयत्ता आठवी सुवर्णपदक या सर्व विद्यार्थ्यांनी विक्रमी यश प्राप्त केले आहे.या सर्व सुवर्णपदक विजेत्यांना शिक्षक सुरज टकले यांचे कडून प्रशिक्षण, मार्गदर्शन मिळाले आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका मृदूला धोडी यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना नेहमीच मिळत असते. आणि यातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळत आहे.सुवर्णपदक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांवर विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदार यांचे वकील
ॲड.निलम भोसले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१३३३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/१२/२०२२

१) श्री.शंतनु घोष
वय : ४९ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.बिल्डींग नं.३, रुम नं.सी-२०१,
कार्तिक्या पार्क सी एच एस एलटीडी,
मालेवाडी, आकुर्ली, रायगड
महाराष्ट्र, पनवेल-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांची पत्नी मयत श्रीमती.गीता घोष यांचे दि.१९/०८/२०१९ रोजी मालेवाडी सुकापूर पनवेल येथे निधन झाले आहे. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मौजे : शिलोत्तर रायचुर, बिल्डींग नं.३, सदनिका नं.२०१, विंग-सी, कार्तिक्या पार्क को.ऑप.हौसिंग सोसायटी, शिलोत्तर : रायचूर, आकुर्ली, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.श्रीमती.गीता घोष यांच्या मालकीची व ताबे कब्जातील आहेत. कै.श्रीमती.गीता घोष यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.श्रीमती.गीता घोष यांना अर्जदार हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय श्री.शंतनु घोष हे कै.श्रीमती.गीता घोष यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२२/११/२०२२ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.रजनी गोवारी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४३४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०१/२०२३

पॉल कोशी व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे.

मयत मेरसी पॉल ह्यांचे निधन दि.२३ डिसेंबर २०२१ रोजी ठाणे येथे झाले आहे. मृत्यूसमयी त्यांच्या नावाने खालील मालमत्ता होती व आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

DESCRIPTION OF THE PROPERTIES

A. Flat No.C-85, C wing on Second Floor, admeasuring about 790 Sq. Ft Built up area and the Open Parking Space bearing no. OCP/C-08 admeasuring about 130 Sq. Ft. in "Raghunath Vihar Army Co-Operative Housing Society Ltd." Plot No.1, Sector-14, Kharghar, Navi Mumbai-410210, Taluka-Panvel, Dist-Raigad. सदरचा फ्लॅट हा मयत व अर्जदार क्रं.१ यांच्या संयुक्त मालकीचा आहे.

B. Shop No.72, Ground Floor, admeasuring 126.156 Sq. Ft. Carpet area, in the society known as "Haware Splendor Co-Operative Housing Society Ltd." Plot No.52 & 56, Sector-20, Kharghar, Navi Mumbai-410210, Taluka-Panvel, Dist-Raigad सदरचे दुकान हे मयत व अर्जदार क्रं.१ यांच्या संयुक्त मालकीचे आहे.

यापुढे यास सदर मालमत्ता असे संबोधण्यात येईल.

वरील प्रमाणे अर्जदार हेच मयत मेरसी पॉल यांचे कायदेशीर वारसदार आहेत व इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. त्यासाठी प्रस्तुतचा चौकशी अर्ज वारस ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला अहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२२/११/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# अरुणशेठ भगत यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष तसेच अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून सुप्रसिद्ध असलेले अरुणशेठ भगत यांचे वाढदिवसानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिष्टचिंतन केले.



सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात अरुणशेठ भगत गेल्या ५० वर्षेहून अधिक काळ सातत्याने कार्यरत आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांचे अत्यंत जवळचे ते सहकारी असून समाजातील तळागाळात अरुणशेठ भगत यांचा परिचय आहे. लोकांच्या सुखदुःखात धावून जाणे हा त्यांचा आत्मा आहे. त्यामुळे अरुणशेठ भगत यांच्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, शहराध्यक्ष जयंत पगडे, शहर सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, अल्पसंख्यांक सेलचे प्रदेश चिटणीस मन्सूर पटेल, कामोठे भाजपचे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी अभिष्टचिंतन करून निरोगी व उदंड आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसानिमित्त गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अभिष्टचिंतन सोहळा, भानघर वृद्धाश्रमास भेट, खेरणे येथे विकासकामांचे उद्घाटन, खांदा गाव येथील ट्राय सिटी बिल्डिंग ऑफिसचे उद्घाटन, कुंडेवहाळ येथे विकासकामांचे उद्घाटन, तसेच शेलघर जि. प. शाळा येथे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीतून कम्प्युटर लॅबचे उद्घाटन आदी विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# नागरिकांनी सिटीझन पर्सेप्शन सर्व्हेमध्ये सहभागी होण्याचे आयुक्त गणेश देशमुख यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिटीझन पर्सेप्शन सर्वेमध्ये महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी केले आहे. याविषयी अधिक माहिती देण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात विविध संघटना, संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक नुकतीच (१७ नोव्हेंबर) बोलविण्यात आली होती.

देशातील राहण्यायोग्य शहरांची स्पर्धा केंद्र शासनाने आयोजित केली आहे. या स्पर्धेमध्ये एक लाख लोकसंख्या व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांचा समावेश आहे. 'इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स' या स्पर्धेत नागरिकांचा सहभाग खूप महत्वाचा आहे.पनवेल महानगरपलिकाही या स्पर्धेत सहभागी झाली आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी या स्पर्धेची माहिती देण्याकरिता पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रोटरी क्लब, व्यापारी संघटना, जेष्ठ नागरिक संघटना, विद्यार्थी संघटना अशा विविध संस्था व संघटनांच्या अध्यक्ष,सचिव,सदस्य यांना महापालिकेच्या मुख्यालयात निमंत्रित केले होते. या स्पर्धेत नागरिकांनी आपले अभिप्राय नोंदवायचे आहेत.

पनवेल शहर हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. नव्याने झालेली पनवेल महानगरपालिका आपल्या शहरांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कसोशिने प्रयत्न करते आहे. महापालिकेने आत्तापर्यंत वडाळे तलाव, जुई तलाव यांचे पूर्वीचे रूप पालटून त्याचे 'खास आकर्षण' केंद्रात रूपांतर केले आहे. याचबरोबरीने छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सुशोभिकरण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे सुशोभिकरण असे अनेक प्रकल्प राबविले आहे. याचबरोबरीने खारघर मधील सिडकोच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेले उत्सव चौक, शिल्प चौक, सेंट्रल गार्डन हे महापलिका क्षेत्रातील विशेष आर्कषणाची स्थळे आहेत.

उत्तम रस्ते, उत्तम आरोग्य सुविधा, उत्तम उद्याने, उत्तम शिक्षण अशा विविध सेवा देण्यासाठी महापलिकाअहोरात्र मेहनत घेत आहेत. येत्या काळात महापालिका नागरिकांना अत्याधुनिक रूग्णालये, खेळाची मैदाने , क्रिक्रेट अकॅडमी असे महत्वपूर्ण प्रकल्प, व गुणवत्तापूर्ण सुविधा देण्यासाठी झटते आहे. नागरिकांनी आपल्या शहराबद्दल अभिमान बाळगून या 'ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्स या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी व्हावे. आपले शहर राहण्यायोग्य शहरामध्ये समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने दिलेल्या 'शेश्र२०२२.ीस'या वेबसाईटवरती जाऊन आपल्या शहराबद्दलचा अभिप्राय नोंदवावा असे आवाहन आयुक्त श्री. गणेश देशमुख यांनी केले आहे. याचबरोबर महापलिका क्षेत्रात सर्वत्र या विषयीचे बॅनरर्स लावण्यात आले आहे, यावरती केंद्र शासनाने दिलेला क्यूआर कोड तसेच सिटी कोड देण्यात आला आहे. नागरिक हा क्यूआर कोड स्कॅन करून देखील आपला अभिप्राय नोंदवू शकतात.

यावेळी उपायुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त सचिन पवार, उपअभियंता सुधीर सांळुखे ,जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी , महापालिका अधिकारी व कर्मचारी तसेच इंडियन मेडिकल असोसिएशचे सदस्य डॉ. गिरीश गुणे, रोटरी क्लब खारघरचे कमलेश धानगलकर, जेष्ठ नागरिक संघाचे सचिव सुनिल खेडकर, कफ संस्थेच्या रंजाना सडोलीकर, इन्फिनीटी फाऊंडेशनचे आयुब आकुला, पनवेल डाक्टरर्स असोसिएशनचे सचिव डॉ. गोपाल लांबटन, पनवेल रोटरी क्लब पनवेलचे कल्पेश परमार,रोटरी क्लब पनवेल सेंट्रलचे अनिल ठाकेकर, आरसीपीआयटीचे सचिव हितेश राजपुत, अल्ट्रास्टिक फाऊंडेशनचे विजय चव्हाण उपस्थित होते.

# इनोव्हा गाडीची स्कुटी गाडीस धडक : तीन जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव इनोव्हा गाडीवरील चालकाने एका स्कुटी गाडीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात पाटील कुटुंबीय जखमी झाल्याची घटना पनवेल - मुंब्रा हायवेच्या कच्या रोडवरील खुटारी गावाजवळ घडली आहे.

क्लेन सिटी मेन गेट समोर जिओ पेट्रोल पंप खुटारी गाव येथून संदीप भगवान पाटील (वय ३६) यांनी त्यांच्या स्कुटी गाडीत पेट्रोल भरून ते तेथून गाडी वरून जात असताना त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजूस इनोव्हा गाडीने घसारा मारून अपघात केल्याने यात संदीप पाटील यांच्यासह त्यांच्या पत्नी प्रांजली पाटील (वय ३४) व सहा वर्षीय मुलगी श्राव्या यांना सध्या व गंभीर स्वरूपाच्या दुखापत झाल्या असून या घटनेनंतर इनोव्हा गाडीवरील चालक गाडीसह पसार झाल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


मा.गुन्नाल साहेब कोर्ट

ॲड.शशिकांत काळु म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६२९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०१/२०२३

१) श्री.एकनाथ मणिराम खानावकर
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२) श्रीमती.आनंदी मणिराम खानावकर
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
३) कै.रामचंद्र मणिराम खानावकर यांचे वारस
३/१) श्रीमती.मालती रामचंद्र खानावकर
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
३/२) श्री.योगेंद्र रामचंद्र खानावकर
वय : ३० वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
३/३) प्रज्योती मिथुन भोईर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
३/४) प्रणाली मेघनाथ पालेकर
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वलवली, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
४) वनिता गणेश गायकर
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.भिंगारवाडी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे वडील अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.३/१ यांचे सासरे, अर्जदार क्र.३/२ ते ३/४ यांचे आजोबा व अर्जदार क्र.४ यांचे वडील कै.मणिराम महादू खानावकर हे दि.२७/०९/२०१२ रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.मणिराम महादू खानावकर यांच्या सामाईक मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १० बी | २२ | २ | १-९-८६ |

वर नमूद मिळकतीत कै.मणिराम महादू खानावकर यांचे वारसदार या नात्याने अर्जदार क्र.१ ते ४ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.मणिराम महादू खानावकर यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.मणिराम महादू खानावकर यांचे अर्जदार नं.१ ते ४ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे सो

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.संगम सावंत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६६७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०१/२०२३

कै.रत्नप्रभा महादेव ठोंबरे (मयत) यांचे वारस
१) श्री.अनिल महादेव ठोंबरे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.गोकुळधाम सोसायटी, रुम नं.अे-१०२,
प्लॉट नं.७, जोसेफ शाळेच्या विरुद्ध, सेक्टर नं.४ ई,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.प्रसाद महादेव ठोंबरे
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए ३/३, नील कमल सोसायटी,
सेंट जोसेफ हायस्कूल, सेक्टर नं.७, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
३) श्री.राजेश महादेव ठोंबरे
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.९२, पोलीस कॉलनी, पळस्पे गाव रोड,
मु.पळस्पे, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.वर्षा अशोक क्षिरसागर
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.२/२०३, द डिस्कव्हरी, दत्ता पाडा रोड,
टाटा स्टील जवळ, बोरीवली ईस्ट,
मंबई, महाराष्ट्र-४०००५६
५) सौ.सुप्रिया दिपक अंबळकर
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ब/२०८, त्रिभुवन सोसायटी, नवघर मणिकपूर रोड,
के.टी.सिनेमा हॉल जवळ, आनंदनगर, वसई (प.),
वसई, ठाणे, महाराष्ट्र-४०१२०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.रत्नप्रभा महादेव ठोंबरे ह्यांचे दि.३०/०९/२०२१ रोजी नायर म्युनिसिपल हॉस्पिटल ॲण्ड मेडीकल कॉलेज, मुंबई येथे निधन झालेले आहे. सबब कै.रत्नप्रभा महादेव ठोंबरे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हेच कायदेशीर वारस आहेत. कै.रत्नप्रभा महादेव ठोंबरे यांच्या नांवे खालील वर्णनाच्या स्थावर मिळकत आहे.

सबब खालील मिळकतींसाठी वारसदाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आसुडगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथील ७०० चौ.फुट. एवढे क्षेत्राची खुली जागा (ओपन प्लॉट)**

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत. तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.रत्नप्रभा महादेव ठोंबरे यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदारांना वारस दाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.सोनावणे साहेब कोर्ट

ॲड.शशिकांत काळु म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/१२/२०२२

१) श्रीमती.मालती रामचंद्र खानावकर
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.योगेंद्र रामचंद्र खानावकर
वय : ३० वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्रीमती.आनंदी मणिराम खानावकर
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
४) प्रज्योती मिथुन भोईर
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
५) प्रणाली मेघनाथ पालेकर
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वलवली, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ यांचे वडील, अर्जदार क्र.३ यांचा मुलगा, अर्जदार क्र.४ व ५ यांचे वडील कै.रामचंद्र मणिराम खानावकर हे दि.२८/०४/२०२१ रोजी मौजे : पोर्टीस हॉस्पिटल, से.१० अे, वाशी, नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. कै.रामचंद्र मणिराम खानावकर यांचे स्वतःच्या मालकीच्या व त्यांचे वडील कै.मणिराम महादू खानावकर यांच्या सामाईक मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १५५/७४+७५ | ७७ | २ | ०-१२-८ |
| | | २३१ | १/४ | ०-१५-४ |
| | | ३३ | २ | ०-०७-४ |
| | | ४९ | १ | ०-१४-१२ |
| | | ८५ | ० | ०-०२-५ |
| नावडे | १५५/७४/७५ | २४६ | ११ | ०-२०-२ |
| नावडे | ४ सी /७४ | ८६ | १ | ०-०२-१ |
| नावडे | ४ सी /७५ | ११२ | २+५ | ०-४०-७ |
| नावडे | १८२ | ४९ | ४ | ०-१८-५ |

**मु.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील**

| अनुक्रमांक | मालमत्ता क्र. | क्षेत्र चौ.फुट/चौ.मी. |
|---|---|---|
| ६९६ | ४४८ | ५५×२४ |
| ६४५ | ४१४ | ५५×२० |
| ४८८ | २९१ | १४०×२० |
| ३६३ | २१२/अ/१ | १८×१९<br>७×१२ |

वर नमूद मिळकतीत कै.रामचंद्र मणिराम खानावकर यांचे वारसदार या नात्याने अर्जदार क्र.१ ते ५ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.रामचंद्र मणिराम खानावकर यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे. सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.रामचंद्र मणिराम खानावकर यांचे अर्जदार नं.१ ते ५ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## शाब्दिक बाचाबाचीतून आरोपीने केला पोलिसांवर हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

न्यायालयाने आरोपीला खटल्याची ८ डिसेंबर ही पुढील तारीख दिली. मात्र त्या संशयिताला पोलिसांच्या ताब्यात न राहता घरी जायचे होते. अखेर वैतागलेल्या आरोपीने पोलिसालाच मारहाण केली. याबाबत गुन्हा नोंद झाला आहे. पनवेल येथील न्यायालयात ही घटना घडली.

४२ वर्षीय संतोष पाटील हा संशयित आरोपी घेऊन पोलीस कर्मचारी ओंकार ठाकरे हे पनवेल न्यायालयात आले होते. पुढील तारीख ८ डिसेंबर देण्यात आली. त्यानंतर पोलीस संतोषला घेऊन जात असताना संतोष पाटील याने तळोजा कारागृहात जाण्यापेक्षा त्याला घरी पाठवावे असा हट्ट पोलिसांसमोर केला. शाब्दिक बाचाबाची झाली. संतोषने पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. पोलिसांचा गणवेश सुद्धा फाडण्याचा प्रयत्न संतोषने केला. पोलिसाला जखमी केल्याने संतोषवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपी संतोष याला करोनाकाळात पत्नीच्या हत्येप्रकरणी अटक केली आहे. कोरोना संसर्गामुळे संतोषला त्याच्या पत्नीने विलगीकरणात ठेवले होते. त्यावरून संतापाच्या भरात त्याने हत्या केली होती.

## सोनाराने लावला ३३ लाखाला ग्राहकांला चुना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहती मधील एका सोनाराने प्रतिमहिना अधिक व्याज देण्याचे आमिष दाखवून एका ग्राहकांला जवळपास ३३ लाखाला चुना लावल्याची घटना घडली आहे.

कामोठे मधील ज्वेलरी दुकान चालकाने सोने खरेदीसाठी गुंतवणूक केल्यास प्रतिमहिना ५ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखविले होते. सेक्टर ३४ मधील केतन गटे यांनी त्यांच्याकडे जुलै २०१९ पासून तब्बल ३६ लाख ७० हजार रुपये सोने खरेदीसाठी गुंतविले होते.

परंतु संबंधित ज्वेलर्स चालकाने प्रत्यक्षात सोनेही दिले नाही व पैसेही परत केले नाहीत. पाठपुरावा केल्यानंतर ३ लाख ४० हजार रुपये परत दिले. परंतु उरलेले ३३ लाख ३० हजार रुपये परत केले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच केतन यांनी कामोठे पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# चला जाणूया नदीला उपक्रमाच्या यशस्वीततेसाठी कटिबद्ध होवू या : अमोल यादव

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



जल है तो कल है या उक्तीतच पाण्याचे महत्व स्पष्ट होते. सुप्रसिद्ध गीतकार ग.दि.माडगूळकर यांनीही त्यांच्या संथ वाहते कृष्णामाई.. या गीताद्वारे पाण्याचे महत्व विषद केले आहे. त्यामुळे आपल्या व आपल्या पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी आपण सर्वांनी चला जाणूया नदीला या उपक्रमाच्या यशस्वीततेसाठी कटिबद्ध होवू या, प्रत्येकाने आपापल्या परीने शक्य तितके योगदान द्यावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी आज येथे केले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत चला जाणूया नदीला हा उपक्रम जलपुरुष डॉ.राजेंद्र सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविला जात आहे. याबाबतची कार्यशाळा जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी अपर जिल्हाधिकारी श्री.यादव बोलत होते.

यावेळी अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, जलसंपदा विभागाच्या प्रभारी कार्यकारी अभियंता दिनेश्री राजभोज, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसिलदार विशाल दौंडकर, नदी संवाद यात्री किशोर धारिया, रवींद्र पाटील, अरविंद म्हात्रे, उदय मानकवळे, चंद्रकांत उत्तेकर, सर्व तहसिलदार व विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी अमोल यादव पुढे म्हणाले की, सजीवांसाठी पाणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. दोन टक्के पाणी पिण्यायोग्य असून त्याचे संवर्धन करणे सर्व सजीवांसाठी आवश्यक आहे. यामुळे या अभियानात आपल्या सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. नद्यांच्या सद्य:स्थितीबाबत श्री.यादव यांनी खंत व्यक्त करून या परिस्थितीकरिता आपणच कारणीभूत असल्याचे परखड मत मांडले. जलसाक्षरता, जलसंवर्धन क्षेत्रात नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांचे नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून व आमिर खान यांचे पानी फाऊंडेशनच्या माध्यमातून मोठे योगदान आहे. या क्षेत्रातील त्यांचे काम आपल्या सर्वांना प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. त्यांच्या कामाचे आपणही अनुकरण करूया, नदीला जाणूया आणि या उपक्रमात रायगड जिल्हा अग्रस्थानी राहील, यासाठी प्रामाणिक प्रयत्न करूया.

दि.१४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापित करण्यात आली असून तालुका स्तरावरही अशा समन्वय समित्या स्थापन होणे आवश्यक असल्याचे श्री.यादव यांनी यावेळी सांगितले. या कार्यशाळेच्या निमित्ताने नदी संवाद यात्री किशोर धारिया यांनी जलपुरुष डॉ.राजेंद्र सिंह यांचा आदरपूर्वक नामोल्लेख करून चला जाणूया नदीला या उपक्रमाबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली तसेच शासन, प्रशासन आणि जनता यांनी मिळून हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

तसेच यावेळी नदी संवाद यात्री उदय मानकवळे, अरविंद म्हात्रे, रवींद्र पाटील या सर्वांनी रायगड जिल्ह्यातील भोगावती, सावित्री, काळ व कासाडी या नद्यांची सद्य:स्थिती, त्यांच्या समस्या तसेच त्यावरील उपाययोजनांबाबत आपले अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

या कार्यशाळेच्या निमित्ताने जलसंपदा विभागाच्या प्रभारी कार्यकारी अभियंता दिनेश्री राजभोज यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती, नद्या, धरणे व जलस्रोतांची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी म्हसळा तहसिलदार समीर घारे यांनी चला जाणूया नदीला या उपक्रमात प्रशासनाने दिलेल्या योगदानाबद्दल आपले मनोगत मांडले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी केले तर आभार सहाय्यक उपवनसंरक्षक संजय कदम यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेचे जिल्हा माहिती कार्यालयाच्या https://fb.watch/gYcqnyprzt/?mibextid=RUbZ1f व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://fb.watch/gYcWD9b8S1/ या फेसबुक पेजवरून थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्यास नेटिझन्स व पर्यावरणप्रेमींकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

## कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या प्रारुप मतदार याद्या २३ नोव्हेंबर रोजी प्रसिध्द होणार

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**


कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार याद्या तयार करण्याबाबतच्या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी बुधवार दि. २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी होणार असल्याची माहिती कोकण विभागाचे उप आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. मनोज रानडे यांनी दिली.

मा. भारत निवडणूक अयोगाकडून कोकण विभाग शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम दि. १ ऑक्टोबर २०२२ ते ३० डिसेंबर २०२२ या कालावधीत राबविण्यात येत असून, दि. १९ नोव्हेंबर रोजी मतदार याद्यांची छपाई करण्यात आल्या नंतर, मतदार नोंदणी नियम १९६० मधील नियम १० नुसार कोकण विभाग मतदार संघातील प्रारुप मतदार याद्या व नोटीस ५ ची प्रसिध्दी बुधवार दि. २३ नोव्हेंबर रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. या प्रारुप मतदार याद्या कोकण विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय, कोकण भवन, सीबीडी बेलापूर तसेच जिल्हाधिकारी तथा सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग यांची कार्यालये व संबंधित जिल्ह्यातील इतर पदनिर्देशित अधिकारी यांची कार्यालये या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येणार आहेत. संबंधित कार्यालयांमध्ये दि. २३ नोव्हेंबर पासून प्रारुप मतदार याद्या मतदारांना तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. दि. २३ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मतदार याद्यांवरील दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. दि. २५ डिसेंबर २०२२ रोजी दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी छपाई करण्यात येईल. दि. ३० डिसेंबर २०२२ शुक्रवार रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल. अशी माहिती कोकण विभागाचे उप आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. मनोज रानडे यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.



**माणगाव तालुक्यातील मांजरोने पंचायत समिती गणातील काँग्रेसचे कार्यकर्ते भांडवली गावातील सतीश नाना सांवंत यांचा बाळासाहेबांची शिवसेनेत पक्षात आमदार भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश. (छाया : पदमाकर उभारे )**

## सुकेळी येथे विद्युत पोलावरील वायर तुटल्यामुळे शॉक लागुन दोन गुरे ठार



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील सुकेळी येथील जिंदाल हॉस्पिटल कॉलनीच्या पाठीमागच्या जागेमधुन सुकेळी गाव व काही आदिवासी वाड्यांकडे विद्युत पुरवठा करणाऱ्या विद्युत पोलावरील वायर तुटल्याने शॉक लागुन सुकेळी (गणपतवाडी) येथील दोन गुरांचा मृत्यु झाला. ही घटना रविवार ( दि.२०) रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. पंरतु यावेळी काम करण्यासाठी आलेल्या महावितरणाच्या दोन कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन लाईनचे काम सुरू करुन गुरे दगावल्याची माहिती कोणालाही न देता वायर झाडाझुडुपांमध्ये लपवुन कर्मचाऱ्यांनी तेथुन पळ काढला. त्यामुळे या घटनेमुळे गणपतवाडी ग्रामस्थांनी महावितरणाच्या गलथान कारभाराबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

यासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार सुकेळी जिंदाल हॉस्पिटल येथील कॉलनीच्या मागे असलेल्या जागेत सकाळच्या वेळेस सुकेळी गणपतवाडी येथील गुरे चरण्यासाठी आली होती. त्याचवेळी या ठिकाणाहून विद्युत पुरवठा करणाऱ्या पोलावरुन वायर तुटल्याने त्या ठिकाणी चरत असलेल्या गुरांवरती वायर पडुन शॉक लागुन यामध्ये गणपतवाडी येथील यशवंत वारगुडे यांचा एक बैल व ताया वारगुडे यांची एक गाय या दोन्ही गुरांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान वायर तुटल्यामुळे सुकेळी विभागातील विजपुरवठा खंडीत झाल्यामुळे येथील स्थानिकांनी महावितरणाच्या कर्मचाऱ्यांना फोन करुन बोलवण्यात आले. परंतु या दोन कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी काम करुन आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या गोष्टींची माहिती देत काम आटोपले व तेथुन पळ काढला. पंरतु या बाबतीत स्थानिकांना याबाबतीत महावितरणाच्या कर्मचाऱ्यांनी कोणतीच माहिती न दिल्यामुळे महिवितरणच्या दोन्ही कर्मचा-यांना ग्रामस्थांनानी घेराव घातला. या घटनेची खबर समजताच गणपतवाडी येथील रहिवासी तथा ऐनघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच उपसरपंच रोहिदास लाड, सदस्य विनोद निरगुडे, ज्येष्ठ सदस्य मनोहरभाई सुटे, राजेंद्र कोकळे, विठ्ठल इंदुलकर, जगन कोकळे तसेच विभागासह गणपतवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

## भगत सिंग कोश्यारी व सुधांशू त्रिवेदी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

औरंगाबाद येथे झालेल्या कार्यक्रमात आपल्या महाराष्ट्राचे राज्यपाल मा. श्री. भगत सिंग कोश्यारी यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनबद्दल वादग्रस्त व्यक्तव्य केलेले होते व तसेच भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. सुधांशू त्रिवेदी यांनी आज तक या वृत्त वाहिनीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाची ५ वेळा माफी मांगीतले असे वादग्रस्त व्यक्तव्य केल्यामुळे या भाजपा सरकारचा व राज्यपाल भगत सिंग कोश्यारी यांचा पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला.



सदर प्रसंगी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते डॉ. भाक्तीकुमार दवे, पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, अरविंद सावळेकर, मल्लिनाथ गायकवाड, शशिकांत बांदोडकर, जनार्दन पाटील, आदम ढलाईत, पनवेल शहर ब्लॉक अध्यक्ष लतीफ शेख, खांदा कॉलनी शहर अध्यक्ष जयवंत देशमुख, सुधीर मोरे, पनवेल शहर जिल्हा उपाध्यक्ष संतोष चिखलकर, मेघनाथ पाटील. तळोजा फेस २ युवक अध्यक्ष मोरेश्वर पाटील, युवक सरचिटणीस शाहीद मुल्ला, चेतन म्हात्रे व आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## थंडीच्या कडाक्याबरोबर सामान्य रूग्णांची संख्या वाढू लागली

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

गेल्या आठ दिवसांपासून वातावरणाचा पारा खाली घसरल्याने थंडीचा कडाकाही वाढू लागला आहे. परिणामी सामान्य रूग्णांची संख्याही वाढू लागली असल्याचे दिसून येत आहे.

थंडीचा मोसम आणि सर्दी, खोकळा व ताप यांचा जवळचा संबंध आहे. तर दिवसेंदिवस थंडी वाढू लागल्याने या सामान्य आजा-राचे रूग्णही वाढू लागल्याने दवाखान्यातही रूग्णांची संख्या वाढू लागली आहे. पहाटेच्या सुमारास पडणारे किरकोळ धुके व बोचणा-या थंडीचा आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. थंडीच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे सर्वांनाच थंडीचा सामना करावा लागत आहे. थंडीच्या त्रासामुळे सर्दी, खोकळा व किरकोळ तापाचे रूग्णही वाढू लागल्याने छोट्या मोठ्या दवाखान्यात रूग्णांची संख्याही वाढू लागली आहे.तर थंडीच्या दिवसात प्रत्येकाने आपापल्या आरोग्याची योग्य ती काळजी घेऊन आपले आरोग्य निकोप कसे राहिल याकडे लक्ष देण्याची सूचना तज्ञ डाँक्टर रूग्णांना देत आहेत.

## ज्येष्ठ नागरिक संघाचा आठवा वर्धापन सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोली, नवी मुंबई येथील ज्येष्ठ नागरिक संघाचा आठवा वर्धापन सोहळा सेक्टर ६ येथील प्रांगणात पार पडला .

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे एन. सी.आर . डी या शिक्षण संस्थेचे खजिनदार आणि सामजिक कार्यकर्ते अविनाश शिंदे हे उपस्थित होते संस्थेचे अध्यक्ष सोपनराव भंडारे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमास शैक्षणिक, राजकारण, सामजिक, व्यापारी क्षेत्रातले अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत उपाध्यक्ष रशीद पठाण यांनी केले.

प्रस्तावना संस्थेचे सचिव भाऊराव चोपडे यांनी केले, उपसचिव पी. एस. हातेकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा सादर केला. यावेळी अविनाश शिंदे यांनी वरिष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले, सुखी ,आनंदी आरोग्यमय सुखीसंपन्न जीवन जगण्यासाठी अनेक पैलू सांगीतले या कार्यक्रमास न्यू कळंबोली एज्यूकेशन संस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील, मेडीकल असोसिएशन रायगडचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक शिंदे, व्यापरी संघाचे अध्यक्ष कमल कोठारी, माजी नगर सेवक बबन मुकादम, रवी पाटील, प्रदीप ठाकूर, विद्या गायकवाड, प्रिय मुकादम,रोटरी क्लब चे जी एस पाटील, तांडेल, पोलिस विभागातील अधिकारी, अनेक सामाजिक कार्यकर्ते, मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष किसन कदम यांनी केले. सखाराम गांगुर्डे यांनी सर्वाचे आभार मानले.

## जागतिक शौचालय दिनानिमित्त विविध उपक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातर्फे जागतिक शौचालय दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. अलिबाग तालुक्यातील सहाण ग्रामपंचायतीला रायगड जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी भेट दिली.

यावेळी उपसरपंच सौंदर्या पोईलकर, माजी पंचायत समिती सदस्य अनिल पाटील, ग्रामसेविका सोनाली नाईक व ग्रामपंचायत सदस्य नरेश वर्तक, ग्रामपंचायत सदस्या निवेदिता पाटील व विद्या मगर आदी उपस्थित होते. ग्रामसेविका सोनाली नाईक यांनी गावा-तील स्वच्छताविषयक कामांची माहिती दिली. यावेळी काही ग्रामस्थांच्या घरातील वैयक्तिक शौचालयांना भेटी देऊन त्याची पाहणी करण्यात आली.

यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले म्हणाल्या की, स्वच्छ भारत अभियानामुळे गावांचा चेहरा मोहरा बदलला आहे. स्वच्छतेमुळे गावामध्ये लोकांचे जीवनमान बदलले आहे तसेच आर्थिक, पर्यावरणीय आरोग्यमान देखील उंचावले आहे. गावात नियमित स्वच्छता राहावी, म्हणून आता सर्व ग्राम ग्रामपंचायतींनी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन व प्लास्टिक बंदीसाठी प्राधान्य द्यावे. शौचालयांचा नियमित वापर झाल्यामुळे गावात स्वच्छतेचे वातावरण टिकून आहे, त्यात सातत्य ठेवावे.

यावेळी सहाणगोटी येथील प्राथमिक शाळेला भेट देऊन विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधण्यात आला. मुख्याध्यापिका दिपाली डोलकर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. जागतिक शौचालय दिनाच्या निमित्ताने ग्रामस्थांनी शौचालयांसमोर रांगोळी काढली होती. फुलांचे हार घालून शौचालयाचे पूजन करण्यात आले. तर शौचालयाची रंगरंगोटी करून शौचालयांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे संवाद तज्ञ श्री.सुरेश पाटील, समाजशास्त्रज्ञ श्री.रविकिरण गायकवाड, सनियंत्रण व मूल्यमापन तज्ञ श्री.दत्तात्रय नाईक आदी उपस्थित होते.